**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**मंगळवार दिनांक ३० डिसेंबर २०२५**

**ठळक बातम्या**

1. **राज्यातल्या महानगरपालिका निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज भरण्याची मुदत आज संपली.**
2. **भारतीय जनता पार्टीतर्फे, नागपूर महानगरपालिकेच्या निवडणुकीसाठी प्रभाग निहाय उमेदवारांची यादी जारी, जुन्या नव्या चेहऱ्यांना संधी.**
3. **रस्ते अपघातांविषयी जनजागृती करण्यासाठी जानेवारी महिन्यात राज्यभरात राष्ट्रीय रस्ता सुरक्षा माह राबवला जाणार.**
4. **आजचा सामना जिंकून श्रीलंकेविरुद्धच्या मालिकेत निर्भेळ यश मिळवण्यासाठी भारतीय महिला क्रिकेट संघ उत्सुक.**
5. **विदर्भ गारठला, नागपूर आणि गोंदियात आज निच्चांकी तापमानाची नोंद.**

भाजपा यादी/शिवसेना

राज्यात  महानगरपालिका निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याचा आज शेवटचा दिवस होता. उद्या या अर्जांची छाननी होईल. २ जानेवारीपर्यंत उमेदवारी अर्ज मागे घेता येतील. ३ जानेवारीला निवडणूक चिन्हाचं वाटप होईल. आणि अंतिम उमेदवार यादी प्रसिद्ध होईल. येत्या १५ जानेवारीला मतदान होणार असून १६ जानेवारीला मतमोजणी होईल. भारतीय जनता पार्टीतर्फे, नागपूर महानगरपालिकेच्या निवडणुकीसाठी प्रभाग निहाय उमेदवारांची यादी जारी करण्यात आली आहे. यंदा काही ठिकाणी जुन्या आणि प्रभावी उमेदवारांना तर काही ठिकाणी नव्या युवा चेहऱ्यांना संधी देण्यात आली आहे.  प्रभाग क्रमांक एक मधून खुल्या संवर्गातून विकी कुकरेजा, प्रभाग दोन मधून एससी महिला आरक्षण संवर्गातून डॉक्टर सरिता मिलिंद माने यांना उमेदवारी देण्यात आली आहे. प्रभाग क्रमांक 12 मधून एसटी संवर्गातून माया इवनाते यांना पुन्हा एकदा संधी देण्यात आली आहे. प्रभाग क्रमांक 15 धरमपेठ मधून सुनील हिरणवार, तर प्रभाग क्रमांक 26 मधून एससी संवर्गातून धर्मपाल मेश्राम, प्रभाग क्रमांक 28 ओबीसी संवर्गातून विजय झलके, प्रभाग क्रमांक 35 मनीष नगर

मधून  एससी संवर्गातून संदीप गवई तर प्रभाग क्रमांक 36 एससी संवर्गातून माया हाडे यांना तसंच  शिवानी दाणी यांना खुल्या संवर्गातून उमेदवारी देण्यात आली आहे. प्रभाग क्रमांक 37 एससी महिला संवर्गातून निधी तेलगोटे यांना उमेदवारी जाहीर झाली आहे. शिवसेनेतर्फे आठ प्रभागांसाठी विविध संवर्गातून उमेदवारांची नावे जाहीर झाली आहेत.

नागपूर मनपा

नागपूर महानगर पालिकेच्या  निवडणुकीत भारतीय जनता पक्ष आणि शिवसेना शिंदे गटात युती झाली असून भारतीय जनता पक्षाने 143 उमेदवार उतरविले आहे तर शिवसेना शिंदे गटाच्या वतीने 8 उमेदवार रिंगणात आहेत. काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गट आणि शिवसेना उबाटा गट युती झाली असून कॉग्रेसने देखील 100 च्या वर उमेदवार रिंगणात उतरविले आहेत. राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाच्या वतीने देखील 100 च्या आसपास उमेदवार रिंगणात उतरविले आहेत.

चंद्रपूर महानगरपालिका

चंद्रपूर महापालिकेच्या एकूण ६६ जागांसाठी राजकीय पक्षांची ताकद पुढे आली आहे. युतीत भाजप सर्वाधिक ५८ जागांवर निवडणूक लढवत असून शिंदे गटाने  ८ जागांवर उमेदवारांना संधी दिली आहे. राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) स्वबळावर ४० जागांवर निवडणूक लढवणार आहे. आघाडीमध्ये काँग्रेसने ६३ जागांवर तर जनविकास सेनेने ३ जागांवर उमेदवार जाहीर केले आहेत. मनसेही स्वबळावर २५ जागांवर निवडणुकीच्या रिंगणात उतरणार आहे. महापालिका निवडणुकीत बहुपक्षीय लढत होणार असल्याने चंद्रपूरचं  राजकीय वातावरण तापले आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस

नागपुरातील राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार पक्षाच्या पक्ष कार्यालयात नाराज पदाधिकाऱ्याकडून तोडफोड करण्यात आली. तिकीट न मिळाल्याने रागाच्या भरात थेट पक्ष कार्यालयातील टीव्ही आणि काच फोडली. नागपुरातील गणेश पेठ येथील राष्ट्रवादी नागपूर शहर ग्रामीण कार्यालयात ही तोडफोड करण्यात आली .

भाजपासोबत युती न झाल्याने राष्ट्रवादीने स्वबळावर लढण्याचा नारा दिला आणि कालपासून एबी फॉर्म वाटप सुरू केले. मात्र ज्यांना उमेदवारी मिळाली नाही अशा पदाधिकाऱ्यांची नाराजी आता उफाळून येताना पाहायला मिळत आहे. दरम्यान अमरावतीचे शिवसेना (उबाठा )प्रणित पश्चिम विदर्भाचे संपर्क प्रमुख - सागर प्रमोद देशमुख यांनी आपल्या असंख्य सहकारी कार्यकर्त्यांसोबत आमदार सुलभा खोडके यांच्या नेतृत्वात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात जाहीर प्रवेश केला.

रिपब्लिकन पक्ष

मुंबई महानगरपालिका निवडणुकीत महायुतीचा घटक पक्ष असणा-या रिपब्लिकन पक्षाकडे भाजपने अक्षम्य दुर्लक्ष केल आहे. महायुतीत सन्मानाचे जागा वाटप झाले नसल्यामुळे मुंबई महानगरपालिकेत रिपब्लिकन पक्ष स्वबळावर निवडणुक लढणार आहे असे प्रतिपादन रिपब्लिकन पक्षाचे अध्यक्ष रामदास आठवले यांनी आज केले. बांद्रा येथील कार्यालयात आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. अजुनही वेळ गेलेली नाही. भाजपने त्यांच्या काही जागांवर माघार घ्यावी आणि किमान 10 ते 12 जागा रिपब्लिकन पक्षाच्या कार्यकर्त्यांना सोडाव्यात. फॉर्म भरण्याचा अंतिम दिवस असला तरी माघार घेण्यासाठी अजुन वेळ आहे, असं आवाहन आठवले यांनी केलं आहे.

संभाजी नगर/ युती

छत्रपती संभाजीनगरमध्ये आपली ताकद वाढली आहे, आपण काहीही करु शकतो, हा अहंकार भाजपच्या मनात निर्माण झाला आहे. याच अहंकारापोटी भाजपने संभाजीनगर महानगरपालिकेत शिवसेनेशी असलेली युती तोडली, असा आरोप शिवसेना शिंदे गटाचे आमदार संजय शिरसाट यांनी केला. छत्रपती संभाजीनगरमध्ये शिवसेना-भाजपने एकत्र लढले पाहिजे, हा आमचा आग्रह होता. त्यामुळे युती तुटल्याचं आम्हाला वाईट वाटत. भाजपच्या काही स्थानिक नेत्यांनी हेतूपूर्वक युती तोडली, असा आरोपही संजय शिरसाट यांनी केला.

सडक सुरक्षा - जीवन रक्षा

रस्ते अपघातांतील जीवितहानी कमी करण्यासाठी केंद्र शासनाच्या निर्देशानुसार राज्यभर 1 ते 31 जानेवारी 2026 या कालावधीत राष्ट्रीय रस्ता सुरक्षा महिना

साजरा करण्यात येणार आहे. ‘सडक सुरक्षा - जीवन रक्षा’ ही यावर्षीची संकल्पना असून नागरिकांमध्ये रस्ता सुरक्षेबाबत जनजागृती करण्यावर भर देण्यात येणार आहे. या अभियानांतर्गत परिवहन विभाग, वाहतूक पोलीस, सार्वजनिक आरोग्य आणि शालेय शिक्षण विभागांच्या सहकार्याने विविध जनजागृती कार्यक्रम राबविण्यात येतील. प्रशिक्षण शिबिरे, कार्यशाळा, परिसंवाद, शालेय विद्यार्थ्यांसाठी जनजागृती सत्रे आणि नेत्र तपासणी शिबिरे आयोजित केली जाणार आहेत. या उपक्रमामुळे रस्ता सुरक्षा नियमांचे पालन वाढून अपघातांचे प्रमाण कमी होईल, असा विश्वास परिवहन आयुक्त, मुंबई यांनी व्यक्त केला आहे.

सांस्कृतिक शक्तीचं दर्शन

२०२५ हे वर्ष भारताच्या सांस्कृतिक शक्तीचं जागतिक स्तरावर ठळक दर्शन घडवणारं ठरलं. अयोध्येतील श्रीराम जन्मभूमी मंदिरावर धर्मध्वज फडकवणे हे भारताच्या सभ्यतागत आत्मविश्वासाचे प्रतीक बनले. ऐकुया भारताच्या सांस्कृतिक यशाचा हा आढावा-

***२०२५ मध्ये प्रयागराज इथं झालेल्या ६६ कोटी भाविकांच्या महाकुंभ मेळाव्याने जगातील सर्वात मोठ्या आध्यात्मिक संमेलनाचा विक्रम प्रस्थापित केला. त्रिपुरा सुंदरी मंदिराचा पुनर्विकास, तसेच राजे राजेंद्र चोळ प्रथम यांच्या समुद्री मोहिमेच्या सहस्त्र वर्षपूर्तीनिमित्त झालेल्या आयोजनातून भारताच्या प्राचीन सांस्कृतिक आणि सागरी भ्रमण परंपरेला उजाळा देण्यात आला. ‘वंदे मातरम’च्या १५० व्या वर्षपूर्तीनिमित्त कोट्यवधी नागरिकांचा सहभाग हा सांस्कृतिक लोकचळवळीचा नमुना ठरला. भगवान बुद्धांचे पवित्र अवशेष भारतात परत येणे, यामुळे भारताची जागतिक सांस्कृतिक प्रतिमा बळकट झाली तर दिवाळी सणाचा युनेस्को अमूर्त सांस्कृतिक वारशात समावेश करण्यात आला. तर ‘ज्ञान भारतम’ उपक्रमातून ज्ञानपरंपरेच्या जतनाची दिशा ठरवली गेली. लोकमाता अहिल्याबाई होळकर यांची ३०० वी जयंती, तसेच ‘जयति जय मम भारतम’ या गिनीज विक्रमप्राप्त सादरीकरणाने २०२५ हे वर्ष भारताच्या सांस्कृतिक सामर्थ्याच सुवर्णपान ठरल.***

निवडणूक निरीक्षक

आगामी अमरावती महानगरपालिका निवडणूक मुक्त, निर्भय आणि  पारदर्शक वातावरणात पार पाडण्यासाठी राज्य निवडणूक आयोगाने डॉ.भरत एन. बस्तेवाड यांची मुख्य निवडणूक निरीक्षक म्हणून नियुक्ती केली आहे. डॉ. बस्तेवाड हे सध्या महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना नागपूरचे आयुक्त आहेत. निवडणूक प्रक्रियेवर काटेकोर नियंत्रण ठेवणे, आदर्श आचारसंहितेची प्रभावी अंमलबजावणी, निवडणूक खर्चावर नियंत्रण आणि आर्थिक बळाचा गैरवापर रोखणे ही त्यांची प्रमुख जबाबदारी असेल. डॉ. बस्तेवाड यांचा भ्रमणध्वनी क्रमांक 9082670035 असा आहे.

महिला टी-ट्वेन्टी

महिला क्रिकेटमध्ये भारत आणि श्रीलंका यांच्यातला २० षटकांचा पाचवा आणि अंतिम सामना आज तिरूवनंतपुरम इथं खेळला जाणार आहे. सामना संध्याकाळी सात वाजता सुरू होईल. पाच सामन्यांच्या मालिकेतले चार सामने जिंकून भारतानं विजयी आघाडी घेतली आहे. आजचा सामना जिंकून या मालिकेत निर्भेळ यश मिळवण्यासाठी हरमनप्रीत कौरच्या नेतृत्वाखाली भारतीय संघ उत्सुक असेल.

हवामान

विदर्भात आज नागपूर आणि गोंदिया जिल्हयात ८ पूर्णांक ६ अंश सेल्सिअस इतक्या सर्वात कमी किमान तापमानाची नोंद करण्यात आली आहे. यवतमाळ इथं  8 पूर्णांक 8 ,गडचिरोली इथं ९ पूर्णांक ६ तर वर्धा आणि भंडारा जिल्हयात १० अंश सेल्सिअस इतक्या किमान तापमानाची नोंद करण्यात आली.  संपूर्ण विदर्भात थंडीचा कडाका कायम असून आगामी तीन तारखेपर्यंत हवामान कोरडे राहणार असल्याचा अंदाज प्रादेशिक हवामान विभागाने वर्तवला आहे.

*****